# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः28.04.2026** **वारः मंगळवार**

1. भारत आणि न्यूझीलंड यांच्यामधील मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या
2. राज्यातल्या युवकांना कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारासाठी 'महाचतुर एआय चॅटबॉट' कार्यान्वित
3. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठीसक्तीच्या मुदतवाढीबाबत आज निर्णयाची शक्यता आणि
4. बनावट बियाणे ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट करणार

**<u>भारत-न्यूझीलंड करार</u>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यामधील मुक्त व्यापार कराराला काल अंतिम स्वरूप देण्यात आले. नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं झालेल्या समारंभात केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅक्ले यांनी या करारावर स्वाक्षरी केली. या करारानंतर सर्व प्रकारच्या भारतीय उत्पादनांना न्यूझीलंडमध्ये शुल्क-मुक्त प्रवेश मिळणार आहे. या शिवाय, औद्योगिक वाढ, नावीन्यपूर्ण उपक्रम, पायाभूत सुविधा आणि रोजगार निर्मिती यासाठी न्यूझीलंडने 20 बिलियन अमेरिकी डॉलर्सच्या दीर्घकालीन गुंतवणुकीची वचनबद्धता दर्शवली आहे. भारतानेही न्यूझीलंडमधून येणाऱ्या अनेक उत्पादनांना आयात शुल्कातून सवलत दिली असली, तरी दुग्धव्यवसाय, कृषी तसंच रत्नं आणि आभूषणे यांसारख्या संवेदनशील क्षेत्रांमधील हितसंबंधांचं रक्षण केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्याचं स्वागत केलं असून आणि दोन्ही देशांमधील भागीदारीतला हा एक ऐतिहासिक क्षण असल्याचं समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<u>चॅटबॉट</u>**

राज्यातल्या युवकांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देणारा 'महाचतुर एआय चॅटबॉट' हा राज्यासाठी परिवर्तनकारी उपक्रम आहे. या चॅटबॉटमुळे युवावर्गाचा, शिक्षण ते रोजगार हा प्रवास अधिक सुकर होईल आणि उद्योगांना कुशल मनुष्यबळ त्वरित उपलब्ध होईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केलं. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या 'चॅटबॉट' च्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेला हा चॅटबॉट, राज्य शासनानं तयार केलेला अशा प्रकारचा देशातला पहिलाच अभिनव उपक्रम आहे. उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ आणि तरुणांना रोजगार या दोघांमध्ये प्रभावी दुवा निर्माण करण्याचं काम ‘महाचतुर चॅटबॉट’ करणार आहे. एआय आधारित 'चॅटबॉट' कौशल्य प्रशिक्षण, रोजगार संधी, उद्योजकता मार्गदर्शन, अर्ज प्रक्रिया, असेसमेंट आणि मार्केट लिंकेज अशा सर्व सेवा वन-स्टॉप सोल्युशन म्हणून उपलब्ध करून देणार आहे.

**<u>चौंडी-विकास</u>**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यातून नवीन पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशानं, तसंच, चौंडी गावाचा विकास करण्याच्या दृष्टीनं विकासकामं हाती घेण्यात आली आहेत. चौंडीमध्ये दर्जेदार सुविधांच्या माध्यमातून पर्यटनाला चालना देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत या संदर्भातल्या बैठकीत दिले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी 681 कोटींची तरतूद करण्यात आली असून, या प्रकल्पाअंतर्गत अहिल्यादेवींचा भव्य पुतळा, सुशोभित उद्यान, नदीकाठाचा विकास, आधुनिक संग्रहालय, ओपन एअर थिएटर आणि पर्यटन सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. प्रकल्पातील काही सुविधा उभारणी आणि देखभालीसाठी खासगी भागीदारी आणण्याबाबत

सकारात्मक विचार सुरू असून, यामुळे पर्यटन सुविधा अधिक दर्जेदार, कार्यक्षम आणि दीर्घकालीन टिकाऊ पद्धतीने विकसित करता येणार असल्याचं फडणवीस म्हणाले.

**रिक्षा-मराठी**

रिक्षा आणि टॅक्सी व्यावसायिक वाहनांच्या चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या मुद्द्यावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल मंत्रालयात बैठक घेतली. मराठी शिकण्यासाठी सहा ते नऊ महिन्यांची मुदत संघटनांच्या प्रतिनिधींनी मागितली आहे, अमराठी चालकांना मराठी शिकण्यासाठी ठराविक मुदत देण्याची ही मागणी योग्य असून त्यावर सकारात्मक विचार सुरू आहे, याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असं प्रताप सरनाईक यांनी काल वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर किमान जुजबी मराठी भाषा बोलता येणं गरजेचं आहे, या भूमिकेशी बैठकीतील सर्वांनी सहमती दर्शवली असं सरनाईक म्हणाले. सरकार आजही मराठी सक्तीच्या निर्णयावर ठाम असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं, तसंच महाराष्ट्रात काम करायचं असेल तर मराठी यायलाच हवी याचा पुनरूच्चार सरनाईक यांनी केला.

**ड्रगमुक्त प्रभाग**

तरुणांमध्ये अमली पदार्थांचं व्यसन वाढत आहे; याबाबत ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट आणि ज्ञानप्रबोधिनीच्या, 'प्रज्ञा मानस संशोधिका विभागानं' पुण्यात नुकतंच एक सर्वेक्षण केलं. त्याबाबतचा 'संयम' हा शहरव्यापी अहवालही प्रसिद्ध करण्यात आला. तरुणांमध्ये व्यसनाविषयी जागरूकता असूनही प्रत्यक्ष व्यसनाचं प्रमाण चिंताजनक आहे. घर, मित्रपरिवार आणि ऑनलाइन माध्यमातून होणारा संपर्क आणि निष्काळजीपणा यामुळे व्यसनाधीनतेची जोखीम वाढत असल्याचं या अहवालात म्हटलं आहे. या समस्येला आळा घालण्यासाठी पुण्यात 'ड्रगमुक्त प्रभाग' अभियान राबवणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली, याबाबत बोलताना अमितेश कुमार म्हणाले....

**पुणे शहर पोलीस दलातर्फे ड्रग्स विरुद्धची मोहीम मोठ्या प्रमाणात सुरू करण्यात आलेली आहे. आणि त्याचे एक भाग म्हणून ड्रग्स फ्री प्रभाग एक नवीन संकल्पना राबविण्यात येत आहे. ज्यामध्ये जे नवीन नवनियुक्त कॉर्पोरेटर्स आहेत त्यांचे त्यांचे प्रभागमध्ये त्यांचे आणि पोलिसांची समन्वयातून लोकसहभागातून अशा प्रकारचे ड्रग्स, ड्रग पेडलर्स आणि ड्रग कन्झ्युमर्स ला शहरातून हद्दपार करण्याची उद्दिष्ट ठेवून ही मोहीम सुरू करण्यात येत आहे. आज ही मोहीम डीसीपी झोन टु यांचे अध्यक्षते खाली त्यांचे एरिया मध्ये सुरू करण्यात येत आहे. मला विश्वास आहे की पुढच्या काळात अशा प्रकारची मोहीम पूर्ण शहरात मोठ्या प्रमाणात राबवून लोकांच्या सहभागातून पूर्णपणे शहरातून ड्रग्स मुक्त शहर ड्रग्स मुक्त राज्य आणि ड्रग मुक्त देश करण्यामध्ये आम्हाला यश मिळेल.**

**हंगामपूर्व-कार्यशाळा**

यंदाच्या खरीप हंगामापासून पहिल्यांदाच बनावट बियाणं ओळखण्यासाठी, बियाण्यांची 'डीएनए फिंगर प्रिंट' टेस्ट केली जाणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात दिली. बियाणे उत्पादक संस्था, वितरक आणि विक्रेते यांच्या खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. आगामी हंगामासाठीची पूर्वतयारी, बियाण्यांचं नियोजन, उपलब्धता आणि वितरण सविस्तर चर्चा या कार्यशाळेत करण्यात आली. बनावट आणि निकृष्ट बियाणांचे उत्पादक आणि विक्रेते यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा भरणे यांनी दिला. तसंच बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी 'साथी' पोर्टलचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, या संपूर्ण प्रक्रियेत बियाण्यांची नोंद डिजिटल साखळीच्या स्वरूपात करण्यात येणार आहे. राज्यात यंदा सुमारे 145 लाख हेक्टर पेरणी क्षेत्र अपेक्षित असून, पिकनिहाय बियाण्यांच्या गरजेच्या 140 टक्के साठा उपलब्ध असल्याची माहिती भरणे यांनी दिली.

**खतविक्रेता-संप-बावनकुळे**

कृषी निविष्ठा अर्थात खतं, बियाणं, औषधे विक्रेत्यांच्या परवाना तपासणी आणि दंड आकारणी प्रक्रियेत सुसूत्रता आणावी, कारवाईतील विसंगती टाळावी आणि शासनस्तरावर असलेल्या प्रलंबित मागण्या तातडीनं मान्य कराव्यात अशा अनेक

मागण्यांसाठी राज्यातील कृषि निविष्ठा विक्रेते बेमुदत संपावर गेले आहेत. संपामुळे काल राज्यातल्या अनेक ठिकाणच्या कृषि निविष्ठा विक्री बाजारपेठा बंद होत्या. शासनानं या प्रकरणाची दखल घेतली असून कृषी विभाग आणि संबंधित अधिकारी, परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून आहेत; यावर लवकरच तोडगा निघेल, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात बोलताना व्यक्त केला. खतांचा कोणताही काळाबाजार सहन केला जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केले.

**कचरा-विलगीकरण**

राज्यातल्या मोठ्या गृहनिर्माण संकुलातील सांडपाणी शुद्धीकरण यंत्रणा आणि गृहनिर्माण संकुलातील कचरा विलगीकरण यांचं ऑडिट केलं जात असून दोषींवर दंडात्मक कारवाई केली जाईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी काल पुण्यात दिली. प्लास्टिक रिसायकलिंग शो इंडिया आणि भारत रिसायकलिंग शो यांच्या वतीनं रिसायकलिंग व्हिजन सिरीज 2026 ही परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या निमित्तानं झालेल्या पत्रकार परिषदेत कदम यांनी एमपीसीबीची प्रदूषण नियंत्रणाबाबतची भूमिका स्पष्ट केली. राज्यात सांडपाणी हे जल प्रदूषण करण्यास मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे; तर कचऱ्याचं विलगीकरण न केल्यानं मातीचं प्रदूषण देखील मोठ्या प्रमाणात वाढत चाललं आहे; त्यामुळेच मंडळानं ही भूमिका घेतली असल्याचं कदम म्हणाले.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात प्रामुख्यानं विदर्भात काही ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. येत्या 24 तासात विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार